# डोंबिवलीत गुंतवणुकीचा जागर

१४ जानेवारी २०२४







Aditya Birla Sun Life Mutual Fund

ADITYA BIRLA CAPITAL

प्रस्तुत

लोकसत्ता

अर्थभान


● गुंतवणूक नियोजन, करविषयक नियोजन आणि जीवनात कमावलेल्या संपत्तीच्या वारसाहक्काच्या नियोजनासाठी इच्छापत्र तितकेच आवश्यक आहे, असे प्रतिपादन आघाडीचे म्युच्युअल फंड घराणे असलेल्या 'आदित्य बिर्ला सन लाइफ म्युच्युअल फंड' प्रस्तुत 'लोकसत्ता अर्थभान' या कार्यक्रमात तज्ज्ञांनी केले. तर म्युच्युअल फंड दीर्घकालीन गुंतवणुकीचा शाश्वत मार्ग असल्याचे आदित्य बिर्ला सन लाइफ म्युच्युअल फंडचे आशय व्यवस्थापक नीलरत्न चौबळ यांनी सांगितले.

● डोंबिवलीतील कार्यक्रमात व्यासपीठावर, दीपक टिकेकर, तृप्ती राणे, अजय वाळिंबे आणि आदित्य बिर्ला सन लाइफ म्युच्युअल फंडाचे नीलरत्न चौबळ.

● डोंबिवली पूर्वेतील ब्राह्मण सभा येथे पार पडलेल्या या गुंतवणूक जागराच्या कार्यक्रमाला गुंतवणूक उत्सुक डोंबिवलीकरांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. यावेळी सूत्रसंचालन सुनील वालावलकर यांनी केले.

"सर्वांनी स्वतःच्या 'जीडीपी' वर म्हणजेच गुंतवणुकीतून (जी) ध्येय (डी) प्राप्तीवर (पी) लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, असा डोंबिवलीच्या गुंतवणूकदारांना सोपा संदेश आहे. डोंबिवली शहराच्या नावातच 'डी' म्हणजेच ध्येय प्राप्ती हे अपेक्षित उद्दिष्ट सामावले असून, त्यासाठी म्युच्युअल फंडाशी मैत्री हाच उत्तम मार्ग आहे. देशासाठी सध्या अमृत काळ सुरू असून गुंतवणूकदारांनी त्यांच्या विविध आर्थिक ध्येयानुरूप म्युच्युअल फंडाच्या श्रेणीवार योजनांची निवड करायला हवी. आयुष्यातील विविध आर्थिक ध्येय साध्य करण्यासाठी म्युच्युअल फंडाच्या विविध योजनांमध्ये लवकरात लवकर 'एसआयपी' सुरू करायला हवी. - **नीलरत्न चौबळ**, आशय व्यवस्थापक, आदित्य बिर्ला सन लाइफ म्युच्युअल फंड